**निवडणूक तात्काळ**

**मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ संदर्भातील आयोगाचे दि.११ नोव्हेंबर, १९९७ चे निर्देश पत्र अधिक्रमित करुन सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत.**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१७/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१/०९/२०१५.

वाचा :- १) मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ
२) राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक:रानिआ-१०९७/प्र.क्र.१७७/९७/पंरा, दि.११ नोव्हेंबर,१९९७ चे पत्र.

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे, आणि

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ च्या तरतुदीनुसार निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यास उमेदवाराच्या मृत्यूबाबत खात्री झाल्यानंतर मतदानासंबंधी प्रत्यादेश दिला पाहिजे अशी तरतूद आहे, आणि त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ-१०९७/प्र.क्र.१७७/९७/पंरा, दिनांक ११ नोव्हेंबर, १९९७ नुसार नियम १४-अ बाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत त्या प्रभागाच्या निवडणुकीबाबत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ नुसार मतदानासंबंधी प्रत्यादेश दिला पाहिजे आणि त्या प्रभागाच्या निवडणुकीसंबंधातील कामकाज सर्व बाबतीत नवीन निवडणूक असल्याप्रमाणे नव्याने सुरू करण्यात आले पाहिजे अशा सूचना दिल्या आहेत, आणि

ज्याअर्थी, मूळ तरतुदीनुसार सामायिक मतपत्रिकेच्या बाबतीत एका उमेदवाराचा मृत्यू झाल्यास संपूर्ण मतपत्रिका बदलावी लागत असल्यामुळे दिनांक ११ नोव्हेंबर, १९९७ चे दिलेले आदेश त्यावेळी योग्य होते. मात्र २००६ च्या नियमातील सुधारणांनुसार प्रत्येक प्रभागातील प्रत्येक वर्गवारीकरीता वेगवेगळी आणि वेगवेगळ्या रंगाची मतपत्रिका असेल अशी तरतूद करण्यात

आल्याने एखाद्या प्रभागातील एखाद्या प्रवर्गातील उमेदवाराचा मृत्यू झाल्यास फक्त त्या प्रवर्गाच्या त्या जागेपुरता निवडणुकीचा प्रत्यादेश देणे शक्य आहे, आणि

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ च्या तरतुदीस अधिन राहून, राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ-१०९७/प्र.क्र.१७७/९७/पंरा, दिनांक ११ नोव्हेंबर, १९९७ नुसार दिलेल्या सूचना रद्द करून नव्याने सूचना देणे आवश्यक झाले आहे,

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग यासंदर्भात यापूर्वी काढलेल्या सूचनांचे अधिक्रमण करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

"ग्रामपंचायत सार्वत्रिक / पोट निवडणुकीच्या प्रक्रियेत मतदानापूर्वी संबंधित प्रभागातील ज्या प्रवर्गातील उमेदवाराचा मृत्यू झाला असेल, त्या प्रवर्गाच्या फक्त त्या जागेच्या निवडणुकीबाबत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम,१९५९ मधील नियम १४-अ नुसार मतदान स्थगित करण्याबाबत प्रत्यादेश दिला पाहिजे व त्या प्रवर्गाच्या फक्त त्या जागेच्या निवडणुकांसबंधातील कामकाज उक्त नियम १४-अ मध्ये नमूद केलेल्या परंतुकांसह सर्व बाबतीत नव्याने सुरू करण्यात आले पाहिजे."

हे आदेश पारित झाल्याच्या दिनांकानंतरच्या सर्व सार्वत्रिक व पोट निवडणुकांकरीता लागू राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र